ePaper

# 2 हजार रुपयांची नोट चलनातून माघारी घेण्याचा RBIचा निर्णय



वर्ष - 7 । अंक -24 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शनिवार, दि. 20 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- राजाचा लाडका पोपट मेलाय!
- वाहतूक पोलिसांचे 'लोका सांगे ब्रह्मज्ञान'!
- पालिका निवडणुका लांबणीवर!



» उकाड्याने नागरीक हैराण
» साडेतीन लाख ग्राहकांचा वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत

## 400 केव्ही अतिउच्चदाबाच्या वीजवाहिन्यांमध्ये बिघाड, सुमारे 3.55 लाख वीजग्राहकांसह 5 ते 6 तास

# पिंपरी-चिंचवडकर अंधारात!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही शिक्रापूर ते तळेगावच्या चारपैकी दोन वीजवाहिन्यांमध्ये गुरूवारी रात्री ७.१० वाजता अचानक तांत्रिक बिघाड झाला होता. त्यामुळे चाकण एमआयडीसीसह पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी व भोसरी विभागातील लाखो ग्राहकांचा वीजपुरवठा बंद पडला. त्यामुळे उकाड्याने नागरीक हैराण झाले होते. अखेरीस बिघाड दुरुस्त झाल्यानंतर रात्री साडे बारानंतर शुक्रवारी पहाटे एक ते सकाळी नऊ वाजेपर्यंत साडेतीन लाख ग्राहकांचा वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात आला. मात्र, उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना रात्रभर त्रास सहन करावा लागला. 'पॉवर ग्रीड'च्या वाहिन्यांची दुरुस्ती पूर्ण झाली असून पुणे, पिंपरी शहरासह चाकण एमआयडीसीचा वीजपुरवठा पूर्ववत झाला आहे.

›अदानींच्या आशिर्वादाने निम्मे पुणे अंधारात »पान 3

## » पुणे, पिंपरी शहरासह चाकण एमआयडीसीचा वीजपुरवठा पूर्ववत

पीजीसीआयएल शिक्रापूर ते पीजीसीआयएल तळेगाव अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिन्यांच्या चारपैकी दोन वाहिन्यांमध्ये गुरूवारी रात्री ७.१० वाजता तांत्रिक बिघाड झाल्यामुळे महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही चाकण, २२० केव्ही चिंचवड, २२० केव्ही उर्से, २२० केव्ही चाकण, १३२ केव्ही चाकण, १३२ केव्ही खराडी या अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद झाला. यात सुमारे ३९६ मेगावॅट विजेचा पुरवठा बंद झाल्यामुळे पिंपरी गाव, चिंचवड, पुनावळे, वाल्हेकरवाडी, वाकड, ताथवडे, किवळे, रावेत, थेरगाव परिसर आणि संपूर्ण प्राधीकरणासह आकुर्डीमधील ५० टक्के परिसरातील २ लाख ३० हजार ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित झाला होता.

पॉवर ग्रीडच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिन्यांच्या देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी असलेल्या अदानी कंपनीकडून बिघाड दुरुस्त करण्याचे काम सुरू होते. पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या (पीजीसीआयएल) अतिउच्चदाब ४०० केव्ही शिक्रापूर ते तळेगावच्या चारपैकी दोन वीजवाहिन्यांमध्ये गुरूवारी (१८ मे) सायंकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अचानक तांत्रिक बिघाड झाला होता. त्यामुळे चाकण एमआयडीसीसह पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील सुमारे ३ लाख ५५ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. या अतिउच्चदाब वीजवाहिन्यांची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर शुक्रवारी सर्वच ग्राहकांचा वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात आला.

### एक तासांचेचक्राकार पद्धतीने विजेचे भारनियमन

» दरम्यान, या तांत्रिक बिघाडामुळे महापारेषणचे अतिउच्चदाब उपकेंद्र बंद पडल्याने तसेच भारव्यवस्थापन शक्य झाले नाही. त्यामुळे गुरुवारी रात्री दहा ते पहाटे तीन वाजेपर्यंत कोथरूड, एसएनडीटी, औंध, बाणेर, शिवाजीनगर, बालेवाडी, बावधन, मॉडेल कॉलनी, पाषाण या भागांमध्ये एक तासांचे चक्राकार पद्धतीने विजेचे भारनियमन करावे लागले. पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या शिक्रापूर ते तळेगाव अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिन्यांच्या चारपैकी दोन वाहिन्यांमध्ये गुरुवारी तांत्रिक बिघाड झाला होता. पाहणीमध्ये तळेगाव नजिकच्या करंजविहिरे गावाजवळ अतिउच्चदाबाची एक वाहिनी तुटून दुसऱ्या वाहिनीवर पडल्याचे दिसून आले. त्यानंतर रात्रीच अदानी कंपनी आणि महापारेषणचे अभियंता आणि कर्मचाऱ्यांकडून संयुक्तपणे या वीजवाहिनीच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आले. परंतु, या बिघाडामुळे महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही चाकण, २२० केव्ही चिंचवड, २२० केव्ही उर्से, २२० केव्ही चाकण, १३२ केव्ही चाकण, १३२ केव्ही खराडी या अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. तब्बल ३९६ मेगावॅट विजेचे वहन बंद पडले होते.

# राजाचा लाडका पोपट मेलाय!

## उपमुख्यमंत्री फडणवीसांचा उद्धव ठाकरेंना टोला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘राज्यातील सरकारबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर या सरकारवर जे जे प्रश्नचिन्ह उपस्थित करीत होते, त्या सर्वांची तोंडं बंद व्हायला हवीत; पण दुर्दैवाने राजाचा लाडका पोपट मेला आहे, हेच कोणी राजाला सांगत नाही. त्यामुळे राजा त्याचाच ढोल बडवत आहे, तर बडवू देत. मात्र, पोपट मेला आहे, यात कोणतीही शंका ठेवू नका,’ अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.**



‘शिंदे-फडणवीस सरकार हे पूर्णतः संविधानिक असून, त्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. आपल्या सर्वांच्या मेहनतीने, आशीर्वादाने हे सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करेल आणि पुन्हा बहुमताने निवडूनही येईल,’ असे फडणवीस म्हणाले. बहुमताने निवडून येण्यासाठी सूक्ष्म व्यवस्थापन गरजेचे असून, त्यासाठी बूथ व्यवस्थापनावर गांभीर्याने काम करणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले.

‘पंतप्रधान नरेंद्र मोदींची कार्यशैली आणि सामान्यांचा विकास हे ध्येय आपण सर्वांपर्यंत पोहोचवायला हवे. सामान्य माणूस ही मोदींची ताकद आहे. सामान्य माणसातील हनुमंत आपल्याला जागा करायचा आहे. ते झाले की सामान्य नागरिकच मोदींना पुन्हा सत्ता मिळवून देतील,’ असेही फडणवीस म्हणाले.

### शरद पवारांवर टीका

‘टीआरपी कसा मिळवायचा याचे नाट्य आपण नुकतेच पाहिले. मीच माझा राजीनामा माझ्याच पक्षाकडे देतो. मग माझाच पक्ष माझ्याच राजीनाम्यावर आक्रोश करेल. मग माझा पक्षच ठरावही करेल. मग मीच राजीनामा मागे घेईन आणि माझ्याच जागी मीच परत येईन. राजीनामा देतो म्हणणे आणि राजीनामा देणे यातला फरक काय, हे शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना आपल्या कृतीतून दाखवून दिले,’ असा टोला फडणवीस यांनी लगावताच सभागृहात हशा पिकला.

### उद्धव ठाकरेंवर निशाणा

‘उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मंत्रालयात जात नाहीत, करोनासारख्या संकटात घरातच बसतात. राज्यातल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीची त्यांना जाणीव नसते, अशी टीका आम्ही केली, तेव्हा आम्हाला महाराष्ट्रद्रोही ठरवले गेले; पण उद्धव ठाकरे आता ज्यांना मानतात, त्या शरद पवारांनीच ‘लोक माझे सांगाती’ या आत्मचरित्रातून उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे,’ असे फडणवीस म्हणाले.

### जंगलाचा राजा स्वबळावरच

‘वाघ दोन प्रकारचे असतात. एक सर्कशीतला वाघ आणि दुसरा जंगलाचा राजा. जंगलचा राजा व्हायचे असेल, तर स्वतःचे बळ लागते,’ अशा शब्दांत फडणवीसांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. सचिन वाझे प्रकरणावरूनही फडणवीस यांनी ठाकरेंवर सडकून टीका केली.

### वर्षभर काम करा, पद मागू नका

‘या वर्षाचे शेवटचे सहा आणि पुढच्या वर्षीचे पहिले सहा महिने आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. या काळात मनात कोणतीही लालसा न ठेवता पक्षासाठी झोकून देऊन काम करा. वर्षभर कोणतेही पद, महामंडळ, समित्या मागू नका. पक्षासाठी काम करताना वर्षभर वैयक्तिक गोष्टींचा त्याग करा. या वर्षात पक्षाने मला काय दिले असे म्हणण्यापेक्षा मी पक्षासाठी काय केले, या भावनेने काम करा. तुमच्या या कामाचे पक्ष योग्य मूल्यमापन करील. तुम्ही म्हणालात, तर मीदेखील वर्षभर पद आणि घराचाही त्याग करायला तयार आहे,’ असे फडणवीस यांनी सांगितले

---

# वाहतूक पोलिसांचे 'लोका सांगे ब्रह्मज्ञान'!

## एकाच खांबावर पार्किंग, नो-पार्किंगचे फलक ?

। पुणे। महाईन्यूज ।

**वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करणाऱ्या वाहतूक पोलिसांची बेशिस्त औंध परिसरात पाहायला मिळते. या ठिकाणी एकाच खांबावर ‘पार्किंग’ आणि नो-पार्किंगचे फलक लावण्यात आले असून, वाहतूक पोलिस मात्र ‘नो-पार्किंग’च्या नावाखाली वाहने उचलून नेण्याची जोरदार कारवाई करीत आहेत. कायद्याच्या रक्षकांकडूनच कायद्याला वाटाण्याच्या अक्षता दाखवून, कारवाई केली जात असल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.**



वाहतूक पोलिसांकडून केल्या जाणाऱ्या वाहन टोइंगच्या कारवाई अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येते. वाहतुकीस अडथळा न करणाऱ्या वाहनांचे आवश्यकता नसतानाही वाहन टोइंग करण्यापासून दुचाकीवर बसलेल्या चालकासह वाहन उचलण्यापर्यंत विविध प्रकार यापूर्वी पाहायला मिळाले आहेत. त्यावर कळस म्हणजे एकाच खांबावर पार्किंग आणि नो-पार्किंगचे फलक लावून नो-पार्किंगची कारवाई करण्याचा वाहतूक पोलिसांचा प्रतापही औंध येथे परिहार चौकात गायकवाड गार्डन येथे पाहायला मिळाला.

### प्रकार काय घडला?

पुण्यातील व्यावसायिक मंगेश काळे त्यांच्या खासगी कामानिमित्त परिहार चौक येथे गेले होते. त्या वेळी त्यांनी गायकवाड गार्डन येथे पार्किंगचा फलक पाहून कार रस्त्यावर उभी केली. काही वेळाने ते त्यांचे काम आटोपून पुन्हा त्या ठिकाणी आले असता, तेथे कार नव्हती. त्यांनी आजूबाजूला चौकशी केल्यावर वाहतूक पोलिसांनी कार टोइंग केल्याचे त्यांना कळाले; तसेच त्यांच्या मोबाइलवर वाहतूक पोलिस कारवाईचा मेसेजही आला होता.

> “एकाच ठिकाणी पार्किंग आणि नो-पार्किंगचे फलक लावून वाहतूक पोलिस नो-पार्किंगची कारवाई करतात, ही बाब निश्चितच पुणे पोलिस दलासाठी लाजिरवाणी आहे. सामान्य नागरिकांना दोन हजार रुपये कमाविण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात. मात्र, पोलिस त्यांच्याकडून चुकीच्या पद्धतीने दोन हजार रुपये वसूल करतात. हे थांबले पाहिजे.
>
> **- मंगेश काळे,** कारचालक

> “संबंधित ठिकाणच्या फलक नियमानुसार नसतील, तर त्यातील अयोग्य फलक काढून टाकण्यासंदर्भात महापालिकेला कळवले जाईल. कारवाईसंदर्भात स्थानिक वाहतूक पोलिसांना सूचना करण्यात येईल.
>
> **- विजय मगर,** उपायुक्त, वाहतूक.

### वाहतूक विभागात घडले काय?

कारवाई झाल्याचे कळाल्यानंतर मंगेश काळे यांनी तेथील एकाच खांबावरील पार्किंग आणि नो-पार्किंगच्या फलकाचे फोटो आणि व्हिडिओ काढले. त्यानंतर त्यांनी चतुःश्रृंगी वाहतूक विभागात धाव घेतली. तेथील वाहतूक पोलिस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकडे त्यांनी नो-पार्किंग कारवाईबाबत विचारणा केली असता, ‘तुम्ही कार नो-पार्किंगमध्ये लावली होती,’ असे उत्तर देण्यात आले. त्यावर काळे यांनी दोन्ही फलकांची छायाचित्रे आणि व्हिडिओ दाखवून कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

---

# व्यावसायिकाला धमकी; पुण्यात आरोपी अन् पोलिसांमध्ये भरदिवसा गोळीबाराचा थरार

। पुणे । महाईन्यूज ।



पुण्यातील एका व्यावसायिकाला ब्लॅकमेल करून कुटूंबियांना ठार करण्याची धमकी देत पाच कोटींची खंडणी मागणाऱ्या तोतया खंडणीखोर पत्रकारांना गुन्हे शाखा खंडणी विरोधी दोनच्या पथकाने पाटस टोलनाका परिसरातून पकडलं. यावेळी आरोपींनी पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचा देखील प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ गाडीच्या टायरवर गोळीबार केला. महेश सौदागर हनमे आणि दिनेश हनमे (दोघेही रा. सोलापूर) अशी खंडणीखोरांची नावे आहेत. या प्रकरणी, रात्री उशीरापर्यंत यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या झटापटीत एक पीलिस कर्मचारी जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडी येथील एका ३४ वर्षीय फिर्यादीची सोनिटीक्स नावाची कंपनी आहे. त्यामाध्यमातून ते व्यवसाय करतात. ऑगस्ट २०२२ पासून आरोपी महेश हा त्यांना तो पत्रकार असल्याचे सांगून बदनामी करण्याच्या उद्देशाने खोट्या बातम्या तयार करून प्रसारीत करण्याबरोबरच खोट्या पोलीस केसमध्ये अडकवण्यासाठी धमकावत होता. त्याद्वारे महेश याने फिर्यादीकडून ३ लाख ८० हजार रुपयांची खंडणी उकळली. मात्र, त्यानंतर देखील तो त्यांच्याकडे पाच कोटींची खंडणी मागत होता.

आरोपींनी खंडणीची मागणी करताच अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे शाखा रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाने सापळा रचाला. दोघा हनमे बंधुना बोलण्यात गुंतवून ठेवून खंडणी घेण्यासाठी लोणी काळभोर परिसरात बोलावून घेतले.

# आकुर्डीत कोट्यवधींचा 'तमाशा'!

## रंगमंचाची रचना नाटकांसाठी अडचणीची, भव्यतेच्या नादात नाटकांचा विसर

**67 कोटी रुपये**

गदिमा नाट्यगृहासाठी झालेला खर्च

**888**


गदिमा नाट्यगृहाची आसनक्षमता

**। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने जवळपास ६६ कोटी रुपये खर्च करून आकुर्डीत 'गदिमा नाट्यगृह' उभारले आहे. मात्र, इतर नाट्यगृहांपेक्षा अर्धवर्तुळाकार आकारात त्याची रचना करण्यात आल्याने व्यावसायिक प्रयोगांसाठी रंगमंचाची जागा अपुरी पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रंगमंचाच्या मागील बाजूस दोन्ही बाजूला 'ग्रीनरूम'ची रचना करणे अपेक्षित असताना एकाच बाजूला वर-खाली ग्रीनरूम बांधण्यात आल्याने कलावंतांची गैरसोय होणार आहे. नाट्यगृहाचे बांधकाम करताना या त्रुटी लक्षात आणून दिल्यानंतरही त्याकडे महापालिकेने लक्ष न दिल्याची तक्रार नाट्यकर्मींनी केली आहे.**



दोन दिवसांपूर्वी 'गदिमा नाट्यगृह'चे औपचारिक उद्घाटन झाल्यानंतर विविध रंगकर्मीकडून येथे व्यावसायिक नाटकाचे प्रयोग होण्याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच गदिमा नाट्यगृहाचे लोकार्पण करण्यात आले. दहा महिन्यांहून अधिक काळ हे नाट्यगृह बांधून पूर्ण असूनही उद्घाटन होत नसल्याने रसिकांसाठी ते खुले होत नव्हते.



### अडचणीचे मुद्दे...

» पिंपरी-चिंचवडमधील यापूर्वीच्या नाट्यगृहांपेक्षा गदिमा नाट्यगृहाची रचना काहीशा वेगळ्या पद्धतीने करण्यात आली आहे.नाट्यगृहाचा प्रमुख रंगमंच आणि प्रेक्षागृह हे अर्धवर्तुळाकार स्वरूपात बांधण्यात आले आहे. रंगमंचाची लांबी-रुंदी इतर रंगमंचाप्रमाणे असली, तरी त्याचा आकार आयताकृती नसल्याने रंगमंचावर पुरेशी जागा उपलब्ध होणार नाही. प्रेक्षागृहाची रचनाही अर्धवर्तुळाकार स्वरूपाची आहे. त्यामुळे शेवटच्या दोन-तीन रांगांमधील प्रेक्षकांना रंगमंचाच्या दोन्ही बाजूंची दृश्यमानता कमी होणार आहे.

### 'ग्रीन रूम'ची अडचण

» सर्वसाधारणपणे कोणत्याही नाट्यगृहात रंगमंचाच्या मागील बाजूस कलावंतांसाठी 'ग्रीन रूम' तयार केलेल्या असतात. काही नाटकांमध्ये वेशभूषा बदलण्यासाठी अत्यंत कमी कालावधी असतो. अशा वेळी रंगमंचाला लागून असलेल्या ग्रीन रूमचा फायदा कलावंतांना होता. गदिमा नाट्यगृहात रंगमंचाच्या एकाच बाजूला वर-खाली अशा स्वरूपात ग्रीन रूम बांधण्यात आल्या आहेत. यामुळे कलावंतांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

---

# अदानींच्या आशिर्वादाने निम्मे पुणे अंधारात: अजित गव्हाणे

## चाकण एमआयडीसीसह पुणे, पिंपरीतील 3.55 लाखांवर वीजग्राहकांना फटका

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

**चेपॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही शिक्रापूर ते तळेगावच्या चारपैकी दोन वीजवाहिन्यांमध्ये गुरूवारी (दि. १८) रात्री ७.१० वाजता अचानक तांत्रिक बिघाड झाला. या पॉवर ग्रीडच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिन्यांच्या देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी असलेल्या अदानी कंपनीकडून बेजबाबदारीचा कळस झाल्यामुळे तब्बल साडेतीन लाख ग्राहकांवर अंधारात राहण्याची वेळ आली. भाजप आणि अदानींच्या आशिर्वादामुळेच हा प्रकार घडला असून भाजपने या प्रकाराची जबाबदारी स्विकारावी व**



**प्रशासनाने अदानी कंपनीवर कडक कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे.**

याबाबत अजित गव्हाणे यांनी पत्रक प्रसिद्धीस दिले असून त्यात म्हटले आहे की, पीजीसीआयएल शिक्रापूर ते पीजीसीआयएल तळेगाव अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिन्यांच्या चारपैकी दोन वाहिन्यांमध्ये गुरुवारी (दि.१८) रात्री ७.१० वाजता तांत्रिक बिघाड झाल्यामुळे महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही चाकण, २२० केव्ही चिंचवड, २२० केव्ही उर्से, २२० केव्ही चाकण, १३२ केव्ही चाकण, १३२ केव्ही खराडी या अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद झाला. यात सुमारे ३९६ मेगावॅट विजेचा पुरवठा बंद झाल्यामुळे पुणे शहरातील प्रामुख्याने खराडी, वडगाव शेरी, विमाननगर, येरवडा, धानोरी आदी परिसरातील सुमारे १ लाख २५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.



तर पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरीगाव, चिंचवड, पुनावळे, वाल्हेकरवाडी, वाकड, ताथवडे, किवळे, रावेत, थेरगाव परिसर आणि संपूर्ण प्राधीकरणासह आकुर्डीमधील ५० टक्के परिसरातील २ लाख ३० हजार असे एकूण ३ लाख ५५ हजारांवर ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. यासोबतच चाकण एमआयडीसीमधील उच्च व लघुदाबाच्या सुमारे ५ हजार औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा बंद पडला. या पॉवर ग्रीडच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिन्यांच्या देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी असलेल्या अदानी कंपनीकडून तात्काळ दुरुस्ती करणे अपेक्षित असतानाही ती करण्यात न आल्यामुळे गुरुवारची संपूर्ण रात्र नागरिकांना अंधारात काढावी लागली.

अदानी समूहाला देखभाल दुरुस्तीचे काम भाजप नेत्यांच्या आशिर्वादाने मिळाले आहे. भाजपचा वरदहस्त असलेल्या या कंपनीने तात्काळ दुरुस्ती करणे अपेक्षित असतानाही त्याकडे दूर्लक्ष केल्यामुळे ऐन उन्हाळ्यात नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. या संपूर्ण प्रकाराची जबाबदारी ही भाजपने नैतिकदृष्ट्या स्विकारावी आणि अदानी कंपनीवर कडक कारवाई करावी, अशी मागणीही गव्हाणे यांनी केली आहे.

### पाच हजार कंपन्यांना फटका...

» अदानी कंपनीच्या नाकर्तेपणाचा तब्बल ५ हजार कंपन्यांना आर्थिक फटका बसला आहे. चाकण, तळेगाव आणि पिंपरी-चिंचवडमधील ५ हजार कंपन्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. जे नुकसान झाले त्याबाबत माहिती घेऊन झालेल्या नुकसानीची जबाबदारी अदानी कंपनीवर निश्चित करावी व ही रक्कम अदानी कंपनीकडून नुकसान झालेल्या कंपन्यांना अदा करण्यात यावी, अशी मागणीही गव्हाणे यांनी केली आहे.

# लंपी चर्मरोग नियंत्रणात पशुसंवर्धन विभागाचे वाढलेले मनोबल...



प्रासंगिक

भाग - 1
**डॉ. व्यंकटराव घोरपडे,**
सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त
पशुसंवर्धन, सांगली.

**20 मे पशुसंवर्धन दिन**

राज्यातील किंबहुना देशातील सर्व पशुपालकांनी नुकताच एका मोठ्या संकटाचा मुकाबला केला आहे. तो म्हणजे लंपी चर्मरोग साथ... अशा या संकटात आपल्या राज्यातील पशुवैद्यकांनी ज्या कष्टाने त्याचा मुकाबला केला त्याची छोटीशी नोंद आजच्या २० मे 'पशुसंवर्धन दिनानिमित्त' घेण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. कारण येणाऱ्या काळात या आणि अशा अनेक रोगाचा सामना सर्वांना करायला लागू शकतो. त्या दृष्टीने 'वन हेल्थ कन्शेप्ट' खाली सर्व पशुवैद्यकीय, वैद्यकीय आणि पर्यावरण तज्ञ एकत्र येऊन निरनिराळ्या उपाय योजनांचा अभ्यास करत आहेत. अशावेळी आजच्या या पशुसंवर्धन दिनाचे औचित्य साधून त्याचा लेखाजोखा या सर्व वाचकापर्यंत पोहोचला पाहिजे या हेतूने हा लेख प्रपंच.

या साथीच्या आजाराचा राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यातील ३३७ तालुक्यात प्रादुर्भाव झाला होता. राज्यातील एकूण १,३९,९२,३०४ गायी-म्हैशींपैकी ४,७९,१३८ पशुधन बाधीत झाले होते पैकी ३९,१५४ पशुधन हे मृत्युमुखी पडले. ४,३६,७७१ इतकं पशुधन हे उपचारांनी वाचवले गेले. तसेच मृत ३९,१५४ पैकी ३६,७०२ पशुधनांची नुकसान भरपाई पशुपालकांच्या खात्यात जमा केली. ती रक्कम ८९.०५ कोटी इतकी होती. अगदी टक्केवारीत सांगायचे झाले तर एकूण पशुधनाच्या तुलनेत बाधीत जनावरांची संख्या ३.४२% होती व मृत्यू दर हा ०.२७ % होता. एकूण लसीकरण देखील १,४१,९८,०७३ म्हणजे जवळजवळ १०१% केले गेले होते. हे सर्व लिहण्याचे कारण म्हणजे आपल्या सर्वांना झालेल्या कामांची नोंद घेता येईल आणि त्या मागच्या पशुवैद्यकांच्या योगदानाची कल्पना येईल. सन २२-२३ मध्ये जुलै २२ पासून या रोगांने महाराष्ट्रासह अनेक राज्यात थैमान घातले होते. आजही अनेक ठिकाणी या रोगाचा प्रादुर्भाव अधुनमधून किरकोळ स्वरूपामध्ये दिसून येतो. खरंतर आपली देशी जनावरे ही काटक असतात, कोणत्याही रोगाला सहजासहजी बळी पडत नाहीत, रोगग्रस्त झाल्यास तात्काळ किरकोळ उपचाराने बरी होतात असे जे समज होते त्याचे गैरसमजात रुपांतर झाले आणि सर्वांनाच त्याचा विचार करायला लावला. देशी गोवंश संवर्धन करण्याच्या आपल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये हा महत्त्वाचा मुद्दा समाविष्ट झाला.



लंम्पी चर्म रोगाच्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यात अनेक वेगवेगळे प्रयोग करण्यात आले. रोगाचा प्रादुर्भाव वाढत होता. विषाणूजन्य रोग असल्याने रोगाचे स्वरूप रोज बदलत होते. केंद्रस्तरावरून सूचना, मार्गदर्शक तत्वे येत होती. अनेक स्थानिक ठिकाणच्या परिस्थितीनुसार त्या सूचना, मार्गदर्शन उपयोगी पडतीलच असे नाही असे ज्यावेळी वाटत होते त्यावेळी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर च्या सहकार्याने सर्व समावेशक उपचार पद्धती तयार करून दृकश्राव्य माध्यमातून सभा आयोजित करून मार्गदर्शन केले. राज्यभर उपचार आणि लसीकरण कार्यक्रम अगदी युद्ध पातळीवर करण्यात आले. वेगवेगळ्या माध्यमातून सदर रोगाबाबत जनजागृती, पशुपालकांनी करावयाचे उपाय, पशुसंवर्धन विभाग,कॉल सेंटरचे टोल फ्री क्रमांक सगळीकडे जाहीर करून त्याद्वारे मार्गदर्शन केले. सोबत प्राण्यांमधील संक्रमण व संसर्गिक रोगप्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ मधील कलम ४(१) नुसार रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास पशुपालक,सरपंच, ग्रामसेवक, स्थानिक स्वराज्य संस्थां, अशासकीय संस्था यांनी त्याची नोंद, माहिती स्थानिक पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय संस्थांना देण्याविषयी आव्हान देखील केले. थोडक्यात अशा सर्व मार्गाचा अवलंब करून या रोगाच्या नियंत्रणासाठी अहोरात्र प्रयत्न केले.

अनेक वेळा अवकाळी पाऊस, रोगास कारणीभूत असणाऱ्या विषाणूचे उत्तपरिवर्तन (MUTATION), अवकाळी पावसामुळे वाढणाऱ्या रोगप्रसारास कारणीभूत कीटकांची संख्या त्यामुळे राज्यातील सर्व पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासह पशुसंवर्धन विभाग दिवस-रात्र मिशन मोडवर काम करत राहिला. रोगाचा प्रादुर्भाव व रोज नवनवीन लक्षणे दाखवणारी जनावरे आणि त्यांचे पशुपालक हे खरोखरच हवालदिल झाले होते. पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी हे साथ रोगाबाबतीत जागरूक असतात. थोड्याशा दुर्लक्षामुळे फार मोठा तोटा हा पशुपालकांना सहन करावा लागतो व त्याचे दूरगामी परिणाम हे देशाच्या, राज्याच्या दुग्ध व्यवसायावर होत असतात. पशुपालकांचे अर्थकारण बिघडते आणि झाले ही तसेच. देशात एकूण १.८९ लाख जनावरे या रोगाला बळी पडले. परिणामी दूध उत्पादन घटले. तूप दूध पावडर याची टंचाई निर्माण झाली. दरवर्षी सहा टक्के दराने वाढणारे दूध उत्पादन हे यावर यावर्षी फक्त एक ते दोन टक्के वाढल्याचे केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे सचिव राजेश कुमार सिंह यांनी जाहीर केले आहे. एका शोध निबंधानुसार देशांचे एकूण रू. १८३३७.७६ कोटी चे निव्वळ आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. एकंदर या रोगामुळे प्रचंड असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नुकसान आपल्या सर्व राज्यातील, देशातील पशुपालकांचे झाले आहे.

**(भाग - 2 उद्याच्या अंकात)**

## संपादकीय »

### अमेरिकी कर्जाचा काळा ढग!

***अमेरिकेकडे एक जूनपर्यंत किंवा त्यानंतरच्या काही आठवड्यांत आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठीचा रोख निधी संपुष्टात येऊ शकतो.***

मुंबई शेअर बाजार बुधवारी दुपारपासून सावरण्याची चिन्हे दिसली आणि शुक्रवारी तर त्याने पुन्हा उभारीच धरली.. दुसरीकडे युरो, ब्रिटिश पौंड आदी चलनांच्या तुलनेत अमेरिकी डॉलरचे मूल्यही भारतातल्या वाढू लागले.. वरवर पाहता या दोन घडामोडींचा एकमेकींशी थेट संबंध दिसणार नाही, पण हा संबंध अपेक्षेहून अधिकच थेट आहे. भारतातल्या मोठ्या शेअर बाजाराची उभारी, आणि युरोपात डॉलरला आलेला भाव हे दोन्ही अमेरिकी सरकारच्या कर्ज-पेचावर तोडगा काढला जाणार असल्याची आशा वाढल्याचे परिणाम आहेत! अमेरिकेची ही एकंदर सार्वजनिक कर्जे वाढत गेली तीही इतकी की, हा आकडा ३१ ट्रिलियन डॉलरवर गेलेला आहे. आताचा प्रश्न ही कर्जे फेडण्याचा नसून, कर्जरूपाने पैसा उभारण्याची अनुमती सरकारला मिळण्याचा आहे. होण्यासाठी अट अमेरिकेचे केंद्रीय कायदेमंडळ अर्थात काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांनी बहुमताने मंजुरी देण्याची!

**अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) छत्तीसगड या काँग्रेसशासित राज्यात चालविलेली मद्यविक्रीतील घोटाळ्याची चौकशी तत्त्वत: चूक नाही. कोणत्याही घोटाळ्यातून करचोरी होऊ नये आणि सामान्य नागरिकांच्या घामातून जन्म घेणारा पैसा काळवंडू नये, ही अपेक्षाही चूक नाही.**

## तर गर्भाशयाचा कर्करोग टाळणे शक्य

कर्करोगापासून बचाव करायचा असेल, तर सुदृढ जीवनशैली फार महत्त्वाची ठरते. मांसाहाराचे अतिसेवन टाळणे, व्यसनाधिनतेपासून दूर राहाणे, नियमित व्यायाम, शरीराची स्वच्छता राखणे, कर्करोगाची कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींनी किंवा पन्नाशीनंतर सर्वांनी किमान वर्षातून एकदा डॉक्टरांच्या सल्ल्याने आरोग्य तपासणी करून घ्यावी. मुलींना पौगंडावस्थेत लस दिल्यास गर्भाशयाचा कर्करोग टाळणे शक्य आहे. या लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती होण्याची देखील आवश्यकता आहे. कर्करोगाचे नेमके स्वरूप काय, या आजारापासून कसा बचाव केला जाऊ शकतो, कर्करोगाचे निदान झाल्यास घाबरून न जाता योग्य उपचार घेण्याबाबतच्या गोष्टी समाजात रुजविण्याची आवश्यकता आहे. कर्करोग कुठून बाहेरून येत नाही. आपले शरीर कोट्यावधी पेशींनी बनले असून या पेशींमध्ये बिघाड झाला, पेशींची साखळी विस्कळीत झाली की कर्करोगाच्या पेशी तयार होतात. कालांतराने त्या फोफावत जातात. ढोबळमानाने आपली जीवनशैली या आजारासाठी कारणीभूत असली तरी बहुतांश कर्करोगांमध्ये चुकीच्या सवयी, व्यसनाधिनता हे प्रमुख कारण ठरते. काहींमध्ये आनुवंशिकता किंवा पेशींमधील बिघाडही कारणीभूत ठरतो. कर्करोगाचे प्रमाण वाढतेय हे जरी खरे असले तरी समाजात त्याबाबत झालेली जागरुकता हे देखील त्याचे कारण आहे. सद्यस्थितीत तपासण्या करून घेण्याबाबत जागरुकता निर्माण होते आहे. चाचण्यांतून निदान होत असल्याने कर्करोगग्रस्तांचा आकडा वाढल्यासारखा वाटतो. जागतिक स्तरावर १७२ पैकी ९१ देशांमध्ये सर्वाधिक मृत्यूच्या कारणांमध्ये कर्करोगामुळे होणारे मृत्यू पहिल्या किंवा दुसऱ्या स्थानी आहेत. भारतात आरोग्याशी निगडित खर्चात कर्करोग हा पहिल्या क्रमांकाचा आजार ठरतो. पंजाब सारख्या राज्यात कर्करोगग्रस्तांच्या उपचारासाठी विशेष रेल्वे चालविली जाते आहे. ही घाबरवणारी नाही तर सतर्क करणारी परिस्थिती आहे.



- अधिक प्रमाणात मांसाहार, तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने कर्करोगग्रस्तांची संख्या वाढते आहे.
- महिलांमध्ये स्वच्छतेचा अभाव, अधिक प्रमाणात गर्भधारणा, कमी वयात लग्न हे गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण ठरते.
- शहरी भागातील महिलांमध्ये स्तनांचा कर्करोग तर ग्रामीण भागातील महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग अधिक आहे.
- स्थूलपणा, जीवनशैलीतील बदलांमुळे मुले, युवकांनाही कर्करोगाने ग्रासले आहे.
- तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे तोंडाच्या, फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढते आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पालिका निवडणुका लांबणीवर!

## प्रभागसंख्येच्या मुद्यावर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी

।मुंबई। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**मुंबई महापालिकेच्या निवडणुका आणखी लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. महाविकास आघाडी सरकारने वाढवलेली प्रभागसंख्या २३६ वरून पुन्हा २२७ करण्याबाबतच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या विशेष अनुमती याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी ठेवली आहे. न्यायालयाने प्रतिवाद्यांना नोटीस बजावून याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.**



या प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस आणि न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी सविस्तर सुनावणी झाली. सुनावणीअंती सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिकेवर प्रतिवाद्यांना नोटीसा बजावून प्रकरणाची पुढील सुनावणी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्याचे स्पष्ट केले.

प्रभागसंख्या पूर्ववत करण्याचा शिंदे सरकारचा निर्णय हा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने असून, तो वैधच आहे, असे नमूद करून या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका उच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात फेटाळल्या होत्या. शिवसेना नगरसेवक राजू पेडणेकर आणि समीर देसाई यांनी या याचिका केल्या होत्या. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला पेडणेकर यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

### युक्तिवाद काय?

**यापूर्वी सदस्यसंख्या वाढीच्या अध्यादेशाला न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. त्यावेळी तो अध्यादेश योग्य असल्याचा निर्वाळा उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. वाढीव सदस्य संख्येप्रमाणे प्रभागरचना, आरक्षण व मतदारयादीचे काम पूर्ण झाले असून, केवळ निवडणूक कार्यक्रम घोषित करण्याची औपचारिकता बाकी आहे. सरकारचा ४ ऑगस्ट २०२२ रोजीचा अध्यादेश घटनाबाह्य आहे, असा युक्तिवाद पेडणेकर यांनी केला आहे.**

---

# अदानी समभागमूल्य वाढण्यात गैरव्यवहार नसल्याचा निर्वाळा

## सर्वोच्च न्यायालयाच्या तज्ज्ञ समितीचा अहवाल जाहीर

।नवी दिल्ली। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**अदानी समूहातील कंपन्यांच्या समभागांचे मूल्य वधारण्यामागे कोणताही गैरव्यवहार झाल्याचा पुरावा आढळला नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीने दिला आहे. अदानी समूहाकडे परदेशी संस्थांकडून आलेल्या पैशांमुळे कायद्याचे उल्लंघन झाल्याच्या कथित आरोपाबद्दल 'सेबी'च्या चौकशीतून काहीही आढळले नसल्याचेही समितीने म्हटले आहे. भांडवली बाजार नियामक 'सेबी'च्या नियमनाचे हे अपयश असल्याचेही चौकशी समितीने अमान्य केले आहे.**



### अहवालातील नोंदी

- 'अदानी समूहाने लाभदायक अशा सर्व भागीदारांबाबतची माहिती जाहीर केली आहे.
- 'हिंडेनबर्ग'च्या अहवालानंतर अदानी समूहातील छोट्या गुंतवणूकदारांचा हिस्सा वाढला.
- 'हिंडेनबर्ग' अहवालानंतर काही कंपन्यांनी अल्पावधीत समभाग विक्रीतून कमावलेल्या नफ्याची चौकशी आवश्यक.
- 'नियमांचे वा कायद्यांचे उल्लंघन झाल्याचे आढळलेले नाही.
- 'संशय असलेल्या १३ परकीय संस्थांबाबत चौकशी करावयाची किंवा नाही, याचा निर्णय 'सेबी'ने घ्यावा.
- 'संबंधित प्रकरण सक्तवसुली संचालनालयाकडे सोपविताना 'सेबी'ने कोणतेही आरोप केले नाहीत.

अमेरिकी गुंतवणूकदार 'हिंडेनबर्ग रिसर्च'च्या अहवालात केल्या गेलेल्या आरोपांनंतर अदानी समूहातील कंपन्यांचे समभाग लक्षणीय प्रमाणात गडगडले होते. तथापि, हा अहवाल येण्याआधी समभाग कोसळतील या अपेक्षेने अदानी समूहातील समभागांवर नफ्यासाठी (शॉर्ट सेलिंग) बाजी लावली गेल्याचे आणि समभागांच्या पडझडीतून काहींनी प्रत्यक्षात नफा कमावल्याचे पुरावे आढळल्याचे समितीने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नियामक चौकट तपासण्यासाठी तज्ज्ञांची ही समिती नेमली होती. या समितीने सर्वोच्च न्यायालयाला ६ मे रोजी अहवाल सादर केला आहे. तो शुक्रवारी जाहीर करण्यात आला. "हिंडेनबर्ग रिसर्चच्या अहवालाआधी आणि नंतर अदानी समूहातील कंपन्यांच्या समभागांत काही कंपन्यांनी नफेखोरी केल्याचे पुरावे आहेत. 'सेबी'ने दिलेले स्पष्टीकरण, आकडेवारी यांचा विचार करून प्रथमदर्शनी यात नियामक यंत्रणेला अपयश आले, असा निष्कर्ष काढणे अशक्य आहे. 'सेबी'ने स्वीकारलेल्या नियमावलीनुसार, स्पष्ट आणि सातत्यपूर्ण धोरणाची भविष्यात आवश्यकता आहे", असे समितीने अहवालात नमूद केले आहे. किमान सार्वजनिक भागधारणा नियम आणि इतर व्यवहार यात नियामक म्हणून 'सेबी'चे अपयश आहे, असे म्हणता येणार नाही, असेही या अहवालात म्हटले आहे. अदानी समूहातील सूचिबद्ध कंपन्यांतील परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या हिस्सेदारीबाबत संशय निर्माण झाल्याने 'सेबी'कडून चौकशी सुरू करण्यात आली आहे. तथापि, अदानी समूहातील समभागांची १३ परदेशी संस्थांच्या मालकीच्या साखळीबाबत काहीही स्पष्टपणे पुढे आणले गेले नाही. 'सेबी'ला १३ परदेशी संस्थांच्या व्यवस्थापनाखालील मालमत्तेमध्ये ४२ जणांनी योगदान दिल्याचे आढळले आणि ते तपासण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जात आहे. अदानी समूहातील कंपन्यांच्या मालकीबाबतचा संशय दूर करण्यासाठी या १३ संस्थांबाबतची चौकशी पुढे चालू ठेवायची किंवा नाही हा निर्णय समितीने 'सेबी'वर सोपविला आहे.

# दोन हजारांच्या नोटा वितरणातून काढल्या; एकनाथ शिंदेंची एका वाक्यात प्रतिक्रिया, म्हणाले...

।नवी दिल्ली। महाईन्यूज। प्रतिनिधी।

आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शुक्रवारी (१९ मे) मोठा निर्णय घेतला आहे. आरबीआयने दोन हजार रुपयांच्या नोटा वितरणातून मागे घेतल्या आहेत. या नोटा अद्याप अवैध ठरवल्या नाहीत. नागरिकांना ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत दोन हजार रुपयांच्या नोटा बँकेत जमा करता येणार आहेत. नागरिकांना एकावेळी दोन हजार रुपयांच्या केवळ १० नोटा (२० हजार रुपये) जमा करता येणार आहेत. "बाजारात इतर मूल्यांच्या नोटा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत," असं कारण देत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दोन हजारांच्या नोटा बाजारातून मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

रिझर्व्ह बँकेनं घेतलेल्या या निर्णयानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे. आरबीआयच्या निर्णयाबद्दल विचारलं असता एकनाथ शिंदे म्हणाले, "आरबीआयने निर्णय घेतला असेल तर तो काही विचाराअंतीच घेतला असेल."



प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

खरं तर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं २००० च्या नोटा वितरणातून काढून घेतल्या असल्या तरी त्या नोटा सध्या अवैध ठरणार नाहीत. त्या आपल्याला दिलेल्या मुदतीपर्यंत जमा करता येणार आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १००० च्या नोटा चलनातून बंद केल्या होत्या. त्यांच्या जागी नवीन ५०० आणि २००० च्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या होत्या. नोव्हेंबर २०१६ मध्ये आरबीआयने २ हजाराची नवीन नोट बाजारात आली होती. त्यानंतर आरबीआयने २०१९ पासून २ हजारांच्या नोटांची छपाईसुद्धा बंद केली होती.

# 'देवों के देव महादेव'च्या पार्वतीचं लग्न....



टीव्ही वरील 'देवों के देव महादेव' या मालिकेतून पार्वतीच्या भूमिकेतुन घराघरात पोहचलेली सोनारिका भदोरिया ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. ती तिच्या बोल्ड फोटोशूटसाठीही ओळखली जाते. टीव्ही शोच्या माध्यमातून ती लाखो चाहत्यांच्या मनावर राज्य करत आहे. अलीकडेच सोनारिकाने उद्योगपती विकास पराशरसोबत तिच्या रोका समारंभातील फोटो पोस्ट केले. इंस्टाग्रामवर तिने याबाबत घोषणा करत चाहत्यांना आंनदाचा धक्का दिला आहे. तिने फोटो पोस्ट करत लिहिले , '3-12-2022 माझ्या संपूर्ण आयुष्यासाठी माझं संपूर्ण हृदय . मला आयुष्यभराची भेट मिळाली! याबद्दल मी सदैव कृतज्ञ राहिलं... हॅप्पी रोका लव्ह. यावेळी सोनारिकाने गुलाबी रंगाचा सीक्विन्ड को-ऑर्ड सेट परिधान केला होता. तर तिच्या जोडीदाराने पांढरा सूट घातला होता. इव्हेंटमध्ये दोघांनीही रोमँटिक पोज दिल्या आहेत. समुद्राच्याच्या किनाऱ्यावर त्यांचा हा समारंभ पार पडला . त्यांनी केक कापून त्याचा आनंद सेलिब्रेट केला. यावेळी त्यांचे कुटुंबीय आणि जवळचे मित्र उपस्थित होते. सध्या, सोनारिकाच्या पोस्टनंतर कमेंटमध्ये अभिनंदनाचा वर्षाव केलाय.

# 'जरा तोंडाला आवर घाला' बबीता भडकली...

तारक मेहता का उल्टा चष्मामध्ये बबिताची भूमिकेतून लोकप्रिय झालेली अभिनेत्री मुनमुन दत्ता ही तिच्या याच आयकॉनिक भूमिकेसाठी आणि सुंदरतेसाठी ओळखली जाते. ती सोशल मिडियावरही चांगलिच सक्रिय असते. तिच्या चाहत्यांची संख्याही कमी नाही. जशी ती जेठालालच्या मनावर राज्य करते तशीच ती तिच्या चाहत्यांच्या मनातही आहे. मात्र तिचा एक व्हिडिओ सध्या व्हायरल होतं आहे.

ती अलीकडेच या वर्षाच्या ITA पुरस्कारांमध्ये सहभागी झाली होती. त्यावेळी ती एंट्री करताच तिच्या वागण्याने सर्वांचे लक्ष वेधलं. तिने रेड कार्पेटवर चालत असताना तिने तिचं संतूलन गमावलं आणि पापाराझींना चांगलाचं फटकारलं आणि यामुळे एकच चर्चा रंगली आहे. यावेळी मुनमुनने हिरव्या रंगाचा ड्रेस परिधान केला होता. त्यासोबतच सिल्वर कानातले आणि केसांचा बन आणि डार्क मेकअप केला होता. रेड कार्पेटवर पोज दिल्यानंतर ती मीडियाशी संवाद साधण्यासाठी पुढे आली. ती अचानकच भडकली आणि म्हणाली, "हे सगळे जे मागे उभ राहून कमेंट करताय , जे नंतर व्हिडिओ पाहिल्यानंतर एकू येत ते जरा कमेंट करण बंद करा. आजकाल तसा ग्रूपचं तयार झाला आहे आज काल." त्यानंतर तिने आयटीए अवॉर्ड्सवर मीडियाच्या प्रश्नाला उत्तर दिले आणि म्हणाली, "आयटीए हा एक मोठा ब्रँड आहे. यासंबंधित असणे हा नेहमीच एक मोठा सन्मान आहे आणि मी एक पुरस्कार देखील सादर करत आहे.



# जॅकलीन कोर्टात हजर... दिलासा नाहीच!

जॅकलीन फर्नांडिसची चित्रपटामधूनही जितकी चर्चा झाली नसेल तितकी मनी लॉंड्रिंग प्रकरणात झाली आहे. सुकेश चंद्रशेखर याने २०० कोटी रुपयांच्या फसवणुकीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात चित्रपट अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस सोमवारी पटियाला हाऊस कोर्टात पोहोचली . फसवणूक प्रकरणी सहआरोपी जॅकलिनविरुद्ध आज न्यायालयात आरोप निश्चित केले जाणार होते, मात्र ईडीच्या विनंतीवरून सुनावणी पुढे ढकलण्यात आली. ईडीच्या विनंतीवरून या प्रकरणाची सुनावणी 20 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली. आजच्या सुनावणीदरम्यान, ईडीच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की ते पुढील युक्तिवादासाठी अद्याप पूर्णपणे तयार नाहीत. त्यामुळे या प्रकरणाच्या पुढील सुनावणीची तारीख निश्चित करण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली . ईडीच्या विनंतीवरून पटियाला हाऊस न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश शैलेंद्र मलिक यांनी या प्रकरणाची सुनावणी २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली.

सुकेश चंद्रशेखरने खंडणीसह गुन्हेगारी कृत्यांमधून जॅकलीन फर्नांडिसला ५.७१ कोटींच्या विविध भेटवस्तू दिल्या होत्या. चंद्रशेखर बराच काळ तिचा साथीदार होता. सुकेशने सहआरोपी पिंकीच्या माध्यमातून जॅकलीनला या भेटवस्तू दिल्या होत्या' असे ईडीने एका निवेदनात म्हटले होते. चंद्रशेखरने फर्नांडिसला भेटवस्तू देण्यासाठी बेकायदेशीर पैशांचा वापर केला, असा आरोपही ईडीने केला आहे. आता या प्रकरणाची सुनावणी २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली.



# विवाहित असूनही अनेकदा प्रेमात पडलाय आमिर..

बॉलीवूडचा परफेक्शनिस्ट म्हणून आमिर खानकडे पाहिलं जातं. आमिरनं आपल्या संपूर्ण फिल्मी कारकिर्दित वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. आणि त्याच्या जवळपास सर्वच भूमिका प्रेक्षकांनी डोक्यावर उचलून धरल्या. अर्थात लाल सिंग चड्ढा सिनेमातील त्याची ड्रीम व्यक्तिरेखा त्याला अपवाद ठरेल. कारण या सिनेमाला लोकांनी ट्रोल तर केलंच शिवाय बॉक्सऑफिसवर सिनेमा दणकून आपटला. अन् आमिरचं मोठं नुकसान झालं. आमिरचं सर्वात वाईट ट्रोलिंग म्हणजे सध्या वयाच्या साठीकडे आले असताना त्याचं नाव तिशीतल्या फातिमा सना शेख या अभिनेत्रीशी जोडलं जात आहे. आता फातिमा काही पहिलीच अशी अभिनेत्री नाही,जिच्यासोबत आमिरचं नाव जोडलं गेलंय. अशा अनेक टॉपच्या अभिनेत्री आहेत ज्यांच्यासोबत आमिरचं सूत जुळल्याची चर्चा त्याचं लग्न झालेलं असताना सुद्धा रंगली होती. चला,आज जाणून घेऊया आमिरच्या अशाच काही सीक्रेट्स अफेअर्सविषयी...




# मराठमोळ्या अभिनेत्रीनं अनेक हिंदी मालिकांना दिला स्पष्ट नकार

अभिनेत्री अनुजा साठेनं विविध माध्यमांत तितकंच वैविध्यपूर्ण काम केलं. मग त्या 'परमाणू', 'बाजीराव-मस्तानी' अशा गाजलेल्या चित्रपटांतल्या छोट्या भूमिका असोत किंवा 'बेगम' वा 'महारानी २' सारख्या सीरीज असोत. 'पेशवा बाजीराव', 'झांसी की रानी', 'मांडला दोन घडीचा डाव' या मालिकांमध्येही ती झळकली. भूमिका निवडीसाठी एक मापदंड सेट केल्याचं ती सांगते.

'कलाकारांनी बोलायचं म्हटलं, तर त्यांना खालच्या पातळीवरचं ऐकून घ्यावं लागतं आणि त्यावरून कलाकारांना पारखलं जातं, त्यामुळे अनेक कलाकार विविध विषयांवर बोलणं टाळतात. ट्रोलर्स इतकी पातळी सोडतात, की त्यामुळे कशावर बोलावं वाटत नाही,' असं स्पष्ट मत अनुजा साठे व्यक्त करते.

अनुजा लवकरच एका विनोदी चित्रपटांत दिसणार आहे. मालिका, सीरीज वा चित्रपट असो ती मोजकं काम करताना दिसते. त्याबद्दल ती म्हणाली, 'विनोदी चित्रपटाचा भाग असणं माझ्यासाठी समाधानाचं आहे. कलाकार म्हणून सगळ्या प्रकारचं काम करायला हवं, हे सतत मनात असतं. मला जे पटत नाही, त्या प्रोजेक्टमध्ये मी काम करीत नाही. अतिशय विनम्रपणे मी नकार देते. अनेक हिंदी मालिकाही मी याच कारणानं नाकारल्या. मी जो मापदंड ठरवला आहे, त्याच्या खाली यायचं नाही. त्यामुळे कदाचित हे मोजकं काम वाटत असावं. सुदैवानं आजपर्यंत माझ्या वाट्याला कास्टिंग काऊचसारखे अनुभव आलेले नाहीत.'





# विक्रमी शतकाने झाले रेकॉर्ड!

## » बंगळुरूचा हैदराबादी नवाबांवर तब्बल आठ विकेट्सने विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ मध्ये झालेल्या ६५व्या लढतीत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने सनरायझर्स हैदराबादचा ८ विकेटनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या हैदराबादने बेंगळुरूला १८७ धावांचे टार्गेट दिले होते. सलामीवीर विराट कोहली आणि कर्णधार फाफ डु प्लेसिस यांच्या शतकी भागिदारीच्या जोरावर आरसीबीने शानदार विजय साकारला. सामन्यातील सर्वात चर्चेचा विषय ठरला तो विराट कोहलीचे स्फोटक शतक होय.**



विराट कोहलीने ६३ चेंडूत १०० धावा केल्या, यात ४ षटकार आणि १२ चौकारांचा समावेश होता. आयपीएलमध्ये चार वर्षानंतर विराटने शतक झळकावले आहे. याआधी त्याने २०१९ साली शतक केले होते. या शतकासह विराटने स्पर्धेत सर्वाधिक शतक करणाऱ्या यादीत स्थान मिळवले आहे. या शिवाय विराटने अनेक विक्रम स्वत:च्या नावावर केलेत.

हैदराबादविरुद्ध धावांचा पाठलाग करताना दुसऱ्या डावात विराटने शतक केले. धावांचा पाठलाग करताना शतक करण्याची विराटची ही दुसरी वेळ आहे. याआधी त्याने २०१६ साली रायझिंग पुणे सुपरजायंट्स संघाविरुद्ध दुसऱ्या डावात ५८ चेंडूत १०८ धावा केल्या होत्या.

आरसीबीकडून सलामीवीर म्हणून दोन शतक करणारा विराट हा पहिला फलंदाज ठरला आहे. याआधी देवदत्त पडिक्कल, पॉल वाल्थाटी, विरेंद्र सेहवाग, शिखर धवन आणि अंबाती रायडू यांनी धावांचा पाठलाग करताना शतक केले होते.

विराट आणि आरसीबी यांचे नाते २००८ पासूनचे आहे. २०१६ साली त्याने एका हंगामात ४ शतक केली होती. २०१९ मध्ये पाचवे शतक तर आता सहावे शतक केले. आयपीएलमध्ये एका संघाकडून कोणत्याही खेळाडूने केलेली ही सर्वाधिक शतक ठरली आहेत. याआधी हा विक्रम क्रिस गेलच्या नावावर होता. त्याने आरसीबीकडून पाच शतक केली होती.

- कसोटी, वनडे क्रिकेटमध्ये शतकांचा विक्रम करणारा विराट आता टी-२० मध्ये देखील किंग झाला आहे.

### शतकांची संख्या 7 झाली

**»टी-२० मधील त्याच्या शतकांची संख्या ७ झाली आहे. भारताच्या एकाही खेळाडूला टी-२० मध्ये इतकी शतक करता आली नाहीत. आयपीएलमधील ६ शतकांसोबत आशिया कप २०२२ मध्ये त्याने अफगाणिस्तानविरुद्ध शतक केले होते. हैदराबादविरुद्धच्या शतकासह त्याने रोहित शर्मा आणि केएल राहुल यांना मागे टाकले, या दोघांच्या नावावर टी-२० मध्ये प्रत्येकी ६ शतक आहेत.**

## अर्जुन तेंडुलकर हा क्रिकेटचा उदय चोप्रा...

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या लेकाचे म्हणजेच अर्जुन तेंडुलकरचे आयपीएलमधील पदार्पण चांगलेच गाजले होते. दोन सामने मुंबई इंडियन्सच्या संघातून खेळल्यावर नंतर मात्र अर्जुन पुन्हा सामन्यातून दिसेनासा झाला आहे. सोशल मीडियावर साहजिकच यावरून चांगलीच ट्रोलिंग सुरु आहे. काही वेळा तर यामध्ये प्रसिद्ध नावे सुद्धा अर्जुनची मस्करी करत आहेत. पण यामध्ये आता एका बोलबच्चन अभिनेत्याने अगदी तिखट शब्दात अर्जुनवर टीका केली आहे. अर्जुनला अयशस्वी म्हणताना या अभिनेता वजा स्वयंघोषित दिग्दर्शक निर्मात्याने त्याची तुलना उदय चोप्राशी केली आहे.



"यशस्वी बापाचा लेक हा अनेकदा अयशस्वीच सिद्ध होतो स्वतःच पाहा यश चोप्रा यांचा लेक उदय चोप्रा आणि आता सचिन तेंडुलकरचा मुलगा क्रिकेटचा उदय चोप्रा!" असे ट्विट या अभिनेत्याच्या अकाउंटवर दिसत आहे. साधारण भाषेने अंदाज आला असल्यास हे ट्वीट केआरके म्हणजेच कमाल आर खान याचे आहे. आश्चर्य म्हणजे यावर अनेकांनी केआरकेच्या बाजूने प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी कमेंटमध्ये अभिषेक बच्चनला सुद्धा टॅग केले होते. तर काहींनी उलट केआरकेवर ताशेरे ओढून तू स्वतः आयुष्यात काही यश मिळवलंय असा उलट प्रश्न केला आहे.

दरम्यान, अलीकडेच झालेल्या मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊ सुपर जाएंट्सच्या सामन्यात अर्जुन तेंडुलकर दिसला नव्हता. या सामन्याच्या आधी अर्जुनला कुत्रा चावला होता असे त्याने मैदानात सांगितले होते. अर्जुनने दुसऱ्याच सामन्यात आपल्या करिअरची पहिली विकेट घेतली होती.

# आरसीबीच्या विजयासह मुंबई इंडियन्सला बसला मोठा धक्का

## » कोहलीमुळे रोहितची चिंता वाढली

। हैदराबाद।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**पाकिस्तानने आरसीबीने हैदराबादच्या संघावर दणदणीत विजय साकारला आणि या विजयासह त्यांनी आपले प्ले ऑफमधील स्थान मिळवण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले आहे. पण या विजयानंतर आता मुंबई इंडियन्सला मोठा धक्का बसला आहे. कोहलीच्या शतकामुळेच आरसीबीला विजय मिळवता आला आणि त्याने रोहित शर्माला पुन्हा एकदा चिंतेत टाकले.**

या सामन्यापूर्वी आरसीबीच्या संघाने १२ सामने खेळले होते. या १२ सामन्यांमध्ये त्यांनी ६ विजय मिळवले होते, तर ६ सामन्यांमध्ये ते पराभूत झाले होते. त्यामुळे ६ सामन्यांतील विजयासह त्यांनी १२ गुण कमावले होते. त्यामुळे आरसीबीचा संघ हा पाचव्या स्थानावर होता. हैदराबादचा सामना आरसीबीने जिंकला आणि त्यांनी दोन गुण मिळवले. त्यामुळे आता आरसीबीचे १४ गुण झाले आहेत. गुणतालिकेत मुंबईचा संघ हा चौथ्या स्थानावर होता आणि त्यांचेही १४ गुण आहेत. पण या दोघांमध्ये फरक आहे तो फक्त रनरेटचा.

मुंबईचा रनरेट हा आरसीबीपेक्षा कमी आहे आणि याचा फायदा आरसीबीला झाला आहे. कारण गुण समान असले तरी रनरेटच्या जोरावर त्यांनी चौथे स्थान पटकावले आहे. त्यामुळे मुंबईच्या संघाची पाचव्या स्थानावर घसरण झाली आहे. मुंबईचा संघ हा टॉप-४ मधून बाहेर पडला आहे. प्ले ऑफमध्ये जाण्यासाठी अव्वल चार संघ पाहिले जातात आणि आरसीबी आता अव्वल चारमध्ये पोहोचला आहे. दुसरीकडे मुंबई मात्र अव्वल चार



संघांमधून बाहेर पडला आहे. त्यामुळे मुंबईसाठी ही धोक्याची घंटा आहे. त्यामुळे आता जर आरसीबीने पुढचा सामना जिंकला तर त्यांचे १६ गुण होतील आणि त्यांना प्ले ऑफमध्ये पोहोचण्याची संधी असेल. त्यामुळे या एका सामन्यामुळे मुंबईला मोठा धक्का बसला आहे.

आता गुणतालिकेत गुजरातचा संघ हा प्ले ऑफमध्ये पोहोचला आहे. दिल्ली आणि हैदाराबाद बाहेर गेले आहेत. त्यामुळे आता सात संघ तीन स्थानांसाठी लढत आहेत. त्यामुळे आता मुंबई, आरसीबी, पंजाब, केकेआर, राजस्थान, लखनौ, चेन्नई यांच्यापैकी कोणते संघ प्ले ऑफमध्ये पोहोचतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल आणि त्याची उत्सुकताही असेल.